सन-२०११ मध्ये जिल्हा परिषदेतील गट-[illegible]
व गट-ड मधील रिक्त पदे भरण्याबाबतची
कार्यवाही करण्याकरिता वेळापत्रक.
भरतीचे निर्बंध नसलेली पदे भरण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
ग्राम विकास व जलसंधारण विभाग
शासन परिपत्रक क्र.एपिटी-२०११/प्र.क्र.२२४/आस्थापना-८,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, दिनांक- ८ ऑगस्ट,२०११.

संदर्भ :
१) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय,
क्र.प्रानिमं-२००७/प्रक्र-४६/०७/१३-अ, दिनांक १९.१०.२००७.
२) ग्राम विकास विभाग, शासन परिपत्रक,
क्र.एपिटी-२००७/प्रक्र-३०३(अ)/आस्था-८, दिनांक १९.०३.२००८
३) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय,
क्र.प्रानिमं-२००७/प्रक्र-४६/०७/१३-अ, दिनांक २७.०६.२००८.
४) ग्राम विकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक,
क्र.एपिटी-२००९/प्रक्र-३५२/आस्था-८, दिनांक १७.१२.२००९.
५) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय,
क्र. बीसीसी-२०११/प्र.क्र.८६/२०११/१६-ब, दिनांक २ ऑगस्ट,२०११.

शासन परिपत्रक :

वित्त विभागाच्या शासन निर्णय दिनांक ५ जून,२०१० नुसार परभरतीच्या निर्बंधामधून वगळण्यात आलेली जिल्हा परिषदेमधील गट-क व गट-ड मधील रिक्त पदे तसेच अ.क्र.५ [illegible] केलेल्या शासना निर्णयानुसार मागासवर्गीयांच्या अनुशेषाची सर्व पदे सन २०११ मध्ये भरण्यासंदर्भातील आदेशानुसार जिल्हा परिषदांमध्ये भरती करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

२. याबाबत शासनाचे असे आदेश आहेत की, जिल्हापरिषदेच्या भरती संदर्भात निर्बंध नसलेली ग्राम सेवक, आरोग्य सेवक पदे व अ.क्र. ५ नुसार मागासवर्गीयांच्या अनुशेषाची गट-क व गट-ड ची रिक्त पदे भरण्यासाठी या विभागाच्या दिनांक १७ डिसेंबर,२००९ च्या शासन परिपत्रकात विहित केलेल्या सूचनेनुसार सन-२०११ या वर्षासाठी पुढील वेळापत्रकानुसार भरतीची कार्यवाही करण्यात यावी :-

अ. क्र.	परिक्षचा वार	वेळ	पदनाम	वेळ	पदनाम
१	सप्टेंबरचा तिसरा रविवार	सकाळी १०.०० ते ११.३०	कनिष्ठ अभियंता/ कृषि अधिकारी/ विस्तार अधिकारी (कृषि) प्रयोगशाळा तंत्रज्ञ	दुपारी २.०० ते ३.०० दुपारी २.०० ते ३.३०	जोडारी/ कनिष्ठ यांत्रिकी/तारतंत्री पर्यवेक्षिका (एकात्मिक [illegible] विकास सेवा योजना/ [illegible] अधिकारी शिक्षण) वर्ग-३ श्रेणी-२

२	सप्टेंबर चा चौथा शनिवार	सकाळी १०.०० ते ११.३०	औषध निर्माता/ वरिष्ठ सहाय्यक (लेखा)	दुपारी २.०० ते ३.३०	आरोग्य सेवक (पुरुष)/ आरोग्य सेवक (महिला) कनिष्ठ आरेखक
३	सप्टेंबरचा चौथा रविवार	सकाळी १०.०० ते ११.३०	कंत्राटी ग्रामसेवक/ आरोग्य पर्यवेक्षक	दुपारी २.०० ते ३.३०	विस्तार अधिकारी (पंचायत)/आरेखक /स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक (समावेशनाची पदे वगळून)
४	ऑक्टोबर चा पहिला रविवार	सकाळी १०.०० ते ११.३०	वरिष्ठ सहायक (लिपिक) पशुधन पर्यवेक्षक	दुपारी २.०० ते ३.३०	कनिष्ठ सहायक (लिपिक)/(लेखा)
५	ऑक्टोबर चा दुसरा शनिवार	सकाळी १०.०० ते ११.३०	विस्तार अधिकारी (सांख्यिकी)/ लघुलेखक/ वाहन चालक	दुपारी २.०० ते ३.३०	कनिष्ठ लेखा अधिकारी परिचर / पट्टीबंधक

सदर भरती एप्रिल,२०१२ अखेर पर्यंतच्या रिक्त पदांसाठी घेण्यात यावी. ग्रामसेवकांची भरती अधिसूचीत करण्यात येत असलेल्या नवीन प्रवेश नियमानुसार घेण्यात यावी.तसेच वाहनचालकांची पदे वित्त विभाग शासन निर्णय दिनांक १० जानेवारी,२०११ नुसार भरण्यात यावीत.

३. शासनाच्या वेबसाईट www.maharashtra.gov.in संगणक संकेतांक २०११०८०८११४९३५००१ अन्वये हे परिपत्रक उपलब्ध करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(प्रकाश हिर्लेकर)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) सर्व विभागीय आयुक्त
२) सर्व जिल्हाधिकारी,
३) सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
४) सर्व सह/ उप सचिव, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई.
५) उप सचिव/ कार्यासन अधिकारी (योजना-५), ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई.
६) निवडनस्ती (कार्यासन आस्था-८),ग्राम विकास व जलसंधारण विभाग.